# ८७.२ टक्के मराठा समाजाचे अल्प उत्पन्न

Mangesh.Indapawar
@timesgroup.com

**नागपूर** : राज्यातील ३२ टक्के मराठा समाज असून त्यापैकी ८७.२ टक्के मराठा समाजाचे वार्षिक उत्पन्न एक लाखाहून कमी आहे. तर ७० टक्के मराठा व कुणबी समाजाकडे केशरी शिधापत्रिका आहे. ७५ टक्के मराठा समाजातील लोक घरगुती काम करीत असून त्यांच्यातील शैक्षणिक स्तरदेखील अत्यंत कमी आहे, अशी महत्त्वाची नोंद राज्य सरकारने सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात करण्यात आली आहे.

**मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ २५०० पानी शपथपत्र**

मराठा समाज शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास असल्याने शिक्षण आणि रोजगारात मराठ्यांना १६ टक्के आरक्षण देण्यात येत असून राज्य घटनेतील कलम १६ (४)नुसार अशाप्रकारचे आरक्षण देण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे, असे मराठा सामाजाच्या आरक्षणाचे सशक्त समर्थन करणारे २,५०० पानांचे शपथपत्र सरकारतर्फे मुंबई हायकोर्टात सोमवारी सादर करण्यात आले.

मराठा सामाजाला आरक्षण देण्याच्या मागणीवरून मुंबई हायकोर्टात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर राज्य सरकारतर्फे मुंबई हायकोर्टातील सरकारी वकील अभिनंदन वग्यानी यांनी शपथपत्र दाखल केले. त्यावर ७ डिसेंबर रोजी हायकोर्टात सुनावणी होणार आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाला पाठिंबा देणारे शपथपत्र दाखल करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला घोषित केले होते. विरोधकांकडून मराठा आरक्षणाच्या मुद्यावर राज्य सरकारची कोंडी होत असतानाच आता सविस्तर शपथपत्र हायकोर्टात सादर झालेले आहे.

## शपथपत्रातील प्रमुख मुद्दे

- १९०२ मध्ये शाहू महाराजांनी मराठ्यांना आरक्षण दिले
- १९३२ च्या जनगणेत मराठा व कुणबी समान मागास असल्याचा पुरावा
- मराठा, क्षत्रिय आणि शुद्रातही समावेश
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या लिखाणांचा आधार
- राज्यात ३२ टक्के मराठा समाज
- ८७.२ टक्के मराठ्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी
- ७० टक्के मराठ्यांकडे केशरी शिधापत्रिका
- राज्याला मागासवर्गीयांना आरक्षण देण्याचा अधिकार

### केळकर समितीचा आधार

राज्य सरकारने विविध समित्या, पाहणी अहवाल यांचे जोडपत्र शपथपत्रासोबत हायकोर्टात सादर केलेले आहे. त्यात बापट कमिशनच्या अहवालासोबतच तत्कालीन आघाडी सरकारने राज्याच्या सर्वांगिण विकासाकरिता शिफारशी करण्यासाठी स्थापन केलेल्या डॉ. विजय केळकर समितीच्या अहवालाचा दाखलाही दिला आहे. केळकर समितीच्या अहवालात राज्यातील आकडेवारीचाही आधार घेण्यात आला आहे.